**नाशिक महानगरपालिका, नाशिक**
**घनकचरा व्यवस्थापन विभाग**
**राजीव गांधी भवन, मुख्यालय, शरणपूर रोड, नाशिक.**

---

**लाड पागे समिती शिफारशीनुसार दिवंगत/सेवानिवृत्त सफाई कर्मचारी यांचे वारसांना नियुक्ती देणेबाबत निवड समिती बैठक दिनांक २८.०२.२०२३**
**इतिवृत्त क्रमांक — ३२**

नाशिक महानगरपालिका आस्थापनेवरील लाड कमिटीच्या शिफारशीनुसार वारसाहक्काने नियुक्ती करीता रिक्त असलेली पदे भरणेकामी कर्मचारी निवड समितीची दिनांक २८.०२.२०२३ रोजी दुपारी १२.०० वाजता अतिरिक्त आयुक्त, (सेवा) नाशिक महानगरपालिका, नाशिक यांचे दालनात संपन्न झाली. सदर बैठकीस खालीलप्रमाणे अधिकारी तथा समिती सदस्य बैठकीस उपस्थित होते.

१) अतिरिक्त आयुक्त (सेवा) :- अध्यक्ष
२) उपआयुक्त( प्रशासन ) :- सदस्य
३) उपआयुक्त (समाजकल्याण) :- सदस्य
४) मुख्य लेखापरिक्षक :- सदस्य
५) मुख्य वित्त व लेखाधिकारी :- सदस्य
६) संचालक, घनकचरा व्यवस्थापन :- सदस्य सचिव

आज दिनांक २८.०२.२०२३ रोजीच्या बैठकीस कर्मचारी निवड समितीचे उपरोक्त सदस्य उपस्थित असल्याने समितीचे कामकाजास सुरुवात झाली. लाड कमिटी शिफारशीनुसार वारसाहक्काने नियुक्ती मिळणेबाबत प्राप्त झालेले एकुण २१ प्रकरणांची समितीसमोर विषयसूची सादर केली असता, विषयसुची मधील नमुद विषयांच्या अनुषंगाने चर्चेस सुरुवात करणेत आली.



Scanned with CamScanner

तथापि, लाड समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने सफाई कामगारांच्या वारसा हक्काच्या अंमलबजावणीबाबत सुधारीत तरतुदींबाबत महाराष्ट्र शासन,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक :- सफाई -२०१८/प्र.क्र.४६/सआक.मंत्रालय, मुंबई यांचेकडील दिनांक २४ फेब्रुवारी २०२३ रोजीचा निर्गमीत झालेला शासन निर्णय दिनांक २८.०२.२०२३ रोजी नाशिक महानगरपालिकेस प्राप्त झाला असुन सदर शासन निर्णयानुसार कार्यवाही होणे आवश्यक असुन समितीसमोर सादर करणेत आलेले लाड कमिटी शिफारशीनुसार वारसाहक्काने नियुक्ती मिळणेबाबत एकुण २१ प्रकरणांची विषयसुची ही पुर्वीच्या शासननिर्णयांचे अनुषंगाने प्रस्तावीत असल्याने दिनांक २४ फेब्रुवारी रोजीच्या शासन निर्णयानुसार निर्णय तथा शिफारस होणेकामी सदर प्रकरणांची पडताळणी होऊन सदरचे प्रकरणे व विषयसुची पुढील समितीसमोर सादर करणेत यावी.

तसेच, दिनांक २४ फेब्रुवारी २०२३ रोजीच्या शासन निर्णयाचे अवलोकन केले असता, शासन निर्णयातील काही मुद्दे हे अस्पष्ट,संभ्रम अवस्था निर्माण होणारे किंवा निश्चित करणेस / अंमलबजावणी करणेस कठिण असल्याचे निदर्शनास येत आहे. याबाबत मा. शासनाचे मार्गदर्शन घेणेकामी सर्वप्रथम सदर बाब ही मा.आयुक्त महोदय यांचे निदर्शनास आणुन देणे आवश्यक आहे.

त्यास्तव, उपआयुक्त ( प्रशासन ) यांचे दालनात कर्मचारी निवड समितीचे सर्व सदस्यांनी एकत्र येऊन मिटींग घेऊन दिनांक २४ फेब्रुवारी रोजीच्या शासन निर्णयातील निर्णयातील सर्व मुद्यांचा अभ्यास तथा पडताळणी करावी. अस्पष्ट, संभ्रम अवस्था निर्माण झालेले किंवा निश्चित करणेस / अंमलबजावणी करणेस कठिण असलेल्या मुद्यांची चर्चा करुन सदरचे मुद्दे समिती अध्यक्ष तथा अति.आयुक्त सो. (सेवा) यांचेकडेस सादर करावे.

वरील प्रमाणे सांगोपांग चर्चा होऊन, दिलेले निर्देश व सुचनांनुसार कार्यपुर्ती करणेत यावी असे समितीने सुचित करुन बैठक संपन्न झाल्याचे जाहिर केले.

| | | |
|---|---|---|
| (डॉ.आवेश पलोड )<br>संचालक, घनकचरा व्यवस्थापन विभाग,<br>नाशिक महानगरपालिका, नाशिक | (नरेंद्र महाजन)<br>मुख्य वित्त व लेखाधिकारी<br>नाशिक महानगरपालिका, नाशिक | (बो. जो. सोनकांबळे)<br>मुख्य लेखापरिक्षक<br>नाशिक महानगरपालिका, नाशिक |
| (नितीन नेर)<br>उपआयुक्त (समाजकल्याण )<br>नाशिक महानगरपालिका, नाशिक | (मनोज घोडेपाटील)<br>उपआयुक्त (प्र.)<br>नाशिक महानगरपालिका, नाशिक | (भाग्यश्री बानायत (भा.प्र.से.)<br>अतिरिक्त आयुक्त,सेवा<br>नाशिक महानगरपालिका, नाशिक |

**प्रत:- माहितीस्तव सविनय सादर**
मा.आयुक्त सो., मनपा, नाशिक



Scanned with CamScanner